"राष्ट्रीय शालेय मध्यान्ह भोजन कार्यक्रम" ही केंद्र पुरस्कृत योजना इयत्ता ६ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी सर्व तालुक्यात सुरु करण्याबाबत...

# महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांक : शापोआ २००८/प्रक्र २६४/प्राशि-४

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.,

दिनांक : ०८ ऑगस्ट, २००८

वाचा :
१) शासन निर्णय क्र.पूप्राशा-१०९५/२१३४/प्राशि-२, दि.२२/११/१९९५
२) शासन निर्णय क्र, शापोआ १००२/१२७५/०२/प्राशि-४, दि.१६/५/२००२
३) शासन निर्णय क्र, शापोआ २००२/१३४१/०२/प्राशि-४, दि.२१/१२/२००२
४) शासन निर्णय क्र, शापोआ १००२/(१४१०/०२)/प्राशि-४, दि.२८/१/२००३
५) शासन निर्णय क्र, शापोआ २००३/(३४/०३)/प्राशि-४, दि.३/३/२००३
६) शासन निर्णय क्र, शापोआ २००४/(२४६/०४)/प्राशि-४, दि.३१/३/२००५
७)शासन निर्णय क्र, शापोआ २००६/(२०१/०६)/प्राशि-४, दि.३१/८/२००६
८)शासन निर्णय क्र, शापोआ २००७/(२२१/००७)/प्राशि-४, दि.२९/१२/२००७
९)केंद्र शासनाचे आदेश क्र. F ३-४/२००८/Desk(MDM-२-२ दि.१६.५.२००८

**प्रस्तावना :** प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्याच्या दृष्टीने तसेच प्राथमिक शाळातील विद्यार्थ्यांच्या पट नोंदणी व उपस्थितीचे प्रमाण वाढविण्यासाठी आणि शाळेतील विद्यार्थ्यांची गळती थांबविण्याकरिता राज्यामध्ये दिनांक २२ नोव्हेंबर, १९९५ पासून इयत्ता १ ली ते ५ वी च्या विद्यार्थ्यांसाठी केंद्र शासन पुरस्कृत शालेय पोषण आहार योजना राबविण्यात येते. राज्यामध्ये ही योजना राज्य व केंद्र शासनाच्या, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, खाजगी अनुदानित व अंशत: अनुदानित शाळा, वस्तीशाळा, महात्मा फुले शिक्षण हमी योजना केंद्रे यांमधील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येते. या योजनेंतर्गत ग्रामीण भागामध्ये ग्राम शिक्षण समिती, शहरी भागामध्ये नगरपालिका, महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या समित्या आणि खाजगी शाळांमध्ये संबंधित शाळा व्यवस्थापन यांचेवर योजनेच्या लाभार्थ्यांना शालेय पोषण आहार देण्याची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. या योजनेअंतर्गत ४५० उष्मांक आणि १२ ग्रॅम प्रथिने युक्त दुपारचे भोजन (Mid-Day Meal) विद्यार्थ्यांना देण्यात येते.

केंद्र शासनाने सन. २००७-०८ या आर्थिक वर्षी शालेय पोषण आहार योजनेचा विस्तार करण्याचे आदेश आणि मान्यता दिल्यानुसार संदर्भाधिन दिनांक २९.१२.२००७ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील

शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या (E.B.B.) ४३ गटातील इयत्ता ६ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना "राष्ट्रीय शालेय मध्यान्ह भोजन कार्यक्रम" (National Programme of Mid-Day Meals in Schools) या योजनेअंतर्गत शालेय पोषण आहार योजना सुरु करण्यात आली आहे. त्यानंतर सन २००८-२००९ वर्षापासून केंद्र शासनाने राज्यातील सर्वच तालुक्यातील इयत्ता ६ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी योजना लागू करण्यास मान्यता दिलेली असून त्याप्रमाणे राज्यामध्ये ही योजना राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

**शासन निर्णय :** "राष्ट्रीय शालेय मध्यान्ह भोजन कार्यक्रम" ही केंद्र पुरस्कृत योजना राज्यामध्ये सर्व तालुक्यात राबविण्यात यावी. या योजनेअंतर्गत इयत्ता ६ वी ते ८ वी च्या वर्गातील विद्यार्थ्यांना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे ७०० उष्मांक (Calories) आणि २० ग्रॅम प्रथिने (proteins) युक्त दुपारचे भोजन (Mid-Day Meal) देण्यात यावे. त्यासाठी प्रति दिन प्रति विद्यार्थी रु.२.५०/- ( रुपये अडीच फक्त) याप्रमाणे आहार खर्च अनुज्ञेय राहील.

२. या योजनेसाठी केंद्र शासनामार्फत प्रतिदिन प्रतिलाभार्थी १५० ग्रॅम मोफत तांदुळ, तांदुळ वाहतूक खर्चासाठी प्रति क्विंटल रुपये ७५/- प्रतिपूर्ती अनुदान, तांदूळापासून भोजन बनविण्यासाठी प्रतिदिन प्रतिलाभार्थी रु. २/- याप्रमाणे अनुदान प्राप्त होणार आहे. त्याचप्रमाणे स्वयंपाकगृह बांधकामासाठी , स्वयंपाकाची भांडी पुरविणे यासाठीही केंद्र शासनाकडून अनुदान प्राप्त होणार आहे.

३. ही योजना राज्यामध्ये राबविण्यासाठी सध्या चालू असणा-या इयत्ता १ ली ते ५ वी साठीच्या शालेय पोषण आहार योजनेप्रमाणेच या योजनेसाठी राज्य शासनाचा हिस्सा म्हणून खालील प्रमाणे खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे. :-

(अ) तांदुळ वाहतूक खर्चासाठी प्रति क्विंटल रुपये ४५/- प्रतिपूर्ती अनुदान

(ब) प्रतिदिन प्रतिलाभार्थी रु. ०.५० (५० पैसे) प्रमाणे तांदूळापासून भोजन बनविण्याच्या खर्चासाठी अनुदान

४. सदर "राष्ट्रीय शालेय मध्यान्ह भोजन कार्यक्रम" ही योजना सन. २००८-०९ या शैक्षणिक वर्षापासून राबविण्यात यावी. "राष्ट्रीय शालेय मध्यान्ह भोजन कार्यक्रम" ही योजना इयत्ता १ ली ते ५ वी च्या शालेय पोषण आहार योजनेच्या प्रचलित पध्दतीप्रमाणे, ज्या प्राथमिक शाळांना इयत्ता ६ वी- ७ वीचे वर्ग जोडले

आहेत, त्या वर्गातील लाभार्थ्यांना सध्याच्या कार्यपद्धतीप्रमाणे विहित केलेला पोषण आहार देऊन राबविण्यात यावी. त्याचप्रमाणे माध्यमिक शाळांमधील इयत्ता ६ वी ते ८ वीच्या विद्यार्थ्यांना विहित केलेला पोषण आहार वाटप स्वतंत्रपणे उपाययोजना करुन ही योजना राबविण्यात यावी.

५. यावर होणारा खर्च " मागणी क्रमांक ई-२, २२०२ सर्वसाधारण शिक्षण -०१-प्राथमिक शिक्षण, (०१) (१५) शालेय पोषण आहार ( केंद्रपुरस्कृत योजना) मुंबई नगरपालिका वगळून इतर क्षेत्र (केंद्र हिस्सा)(२२०२ ३८०६) , (०१) (१६) शालेय पोषण आहार ( केंद्रपुरस्कृत योजना) मुंबई नगरपालिका वगळून इतर क्षेत्र (राज्य हिस्सा) (२२०२ ३८१५) , (०३) (०३) शालेय पोषण आहार ( केंद्रपुरस्कृत योजना) मुंबई नगरपालिका (केंद्र हिस्सा)(२२०२ ३८२४) , (०३) (०४) शालेय पोषण आहार ( केंद्रपुरस्कृत योजना)मुंबई नगरपालिका वगळून इतर क्षेत्र (राज्य हिस्सा) (२२०२ ३८३३) या लेखाशिर्षाखालील चालू आर्थिक वर्षाकरीता करण्यात आलेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

६. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ५०१/२००८/व्यय ५ दि.२/८/२००८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

७. हे शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या संगणकीय संकेतस्थळावर क्र. २००८०८०८१५३००००१ अन्वये प्रसिध्द करण्यात आले आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

8/8/2008

(प्रकाश साबळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
मुख्यमंत्र्याचे सचिव, मंत्रालय, मुंबई
मंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव
राज्यमंत्री, शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव
सर्व मंत्री / राज्यमंत्री, मंत्रालय मुंबई
सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
शिक्षण संचालक (माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व महसूल विभागीय आयुक्त
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

सह संचालक, नागरी पुरवठा (गोदाम व वाहतूक), मुंबई
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
शिक्षणाधिकारी (प्राथमिक आणि माध्यमिक), सर्व जिल्हे
सर्व शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी, सर्व महानगरपालिका/नगरपालिका
सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी
सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
निवासी लेखा अधिकारी, मुंबई
सर्व मुख्य लेखा परीक्षक
वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई-२०.
नियोजन विभाग , मंत्रालय, मुंबई वित्त विभाग
वित्त विभाग , मंत्रालय, मुंबई
ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
शालेय शिक्षण विभाग (अर्थसंकल्प)
निवड नस्ती, प्राशि-४